दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज

संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

# रायगड नगरी

रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित

● वर्ष १७ वे ● अंक ६३ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● शुक्रवार दि.३ जून २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com



लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त सुविद्य पत्नी शकुंतला ठाकूर यांच्याकडून औक्षण करण्यात आले.

पनवेल महानगरपालिका







"स्वराज्य"

प्रशासकीय इमारत

भूमीपूजन समारंभ

व

विकास कामांचे लोकार्पण



तारीख व वेळ

शुक्रवार, ३ जून २०२२

वेळ : सायं. ५.३० वा.

स्थळ

आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल.

विविध विकासकामांचे भूमीपूजन

शुभहस्ते

मा. श्री. देवेंद्र फडणवीस
विरोधी पक्षनेते, विधानसभा, महाराष्ट्र राज्य

मा. श्री. एकनाथ शिंदे
मंत्री, नगर विकास, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम), महाराष्ट्र राज्य

मा. कु. आदिती सुनिल तटकरे
राज्यमंत्री उद्योग, खनिज फर्म, पर्यटन, क्रीडा व युवक कल्याण तथा पालकमंत्री रायगड, महाराष्ट्र राज्य

समारंभाध्यक्षा

मा. डॉ. कविता किशोर चौतमोल
महापौर, पनवेल महानगरपालिका

उपस्थित मान्यवर

मा. श्री. सुनिल तटकरे – लोकसभा सदस्य

मा. श्री. श्रीरंग बारणे – लोकसभा सदस्य

मा. श्री. अनिकेत तटकरे – विधान परिषद सदस्य

मा. श्री. बाळाराम पाटील – विधान परिषद सदस्य

मा. श्री. निरंजन डावखरे – विधान परिषद सदस्य

मा. श्री. जयंत पाटील – विधान परिषद सदस्य

मा. श्री. महेंद्र दळवी – विधानसभा सदस्य

मा. श्री. रविशेठ पाटील – विधानसभा सदस्य

मा. श्री. प्रशांत ठाकूर – विधानसभा सदस्य

मा. श्री. भरत गोगावले – विधानसभा सदस्य

मा. श्री. महेश बालदी – विधानसभा सदस्य

मा. श्री. महेंद्र थोरवे – विधानसभा सदस्य

मा. श्री. नरेश गणपत ठाकूर – सभापती, स्थायी समिती

मा. श्रीमती सिताताई सदानंद पाटील – उप महापौर

मा. श्री. प्रितम जनार्दन म्हात्रे – विरोधी पक्ष नेता

मा. श्री. परेश रामशेठ ठाकूर – सभागृह नेता

सन्माननीय नगरसेवक, नगरसेविका, अधिकारी व कर्मचारी वर्ग

विनीत

गणेश देशमुख
आयुक्त,
पनवेल महानगरपालिका

# राज्यातील वाढत्या कोरोना रुग्णसंख्येची मुख्यमंत्र्यांकडून गंभीर दखल



**दै.रायगड नगरी । मुंबई**

**जवळपास दोन वर्षांनंतर राज्यातील कोरोनाचा संसर्ग नियंत्रणात आला होता. मात्र गेल्या काही दिवसांमध्ये राज्यातील कोरोनाच्या रुग्णांची संख्या अचानक मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. त्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्र्यांनी आज टास्कफोर्सची बैठक बोलावली होती. या बैठकीमध्ये कोरोनाच्या सद्यस्थितीबाबत चर्चा करण्यात आली. त्यानंतर मुख्यमंत्र्यांनी काही महत्त्वाचे निर्णय जाहीर करत जनतेला महत्त्वाचं आवाहन केलं आहे. निर्बंध नको असतील तर शिस्त पाळा, मास्क वापरा, लसीकरण करुन घ्या, असं आवाहन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केलं आहे.**

राज्यात कोरोना पुन्हा डोके वर काढत आहे. गेल्या काही दिवसांपासून कोविड बाधित रुग्णांची संख्या वाढत आहे. राज्य शासन पुढील पंधरा दिवस लक्ष ठेवून असेल. निर्बंध नको असतील तर नागरिकांनी स्वतःहून शिस्त पाळावी. मास्क वापरावा, लसीकरण करून घ्यावे, हात धुवावे आणि अंतर ठेवावे, असे आवाहन मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांनी आज येथे केले.

मुख्यमंत्र्यांनी आज सायंकाळी कोविड टास्क फोर्स समितीच्या सदस्यांशी चर्चा केली. त्यावेळी त्यांनी या सूचना दिल्या.या बैठकीस मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव, मुख्यमंत्री यांचे प्रधान सल्लागार सीताराम कुंटे, सार्वजनिक आरोग्य विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव डॉ प्रदीप व्यास, मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव आशिष कुमार सिंह आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांनी सांगितले की, गेल्या काही दिवसांत कोविड रुग्णांच्या संख्येत वाढ होत आहे. वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञांनी दिलेल्या सूचनांनुसार कोविड आणखी वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे शासन पुढील पंधरा दिवस परिस्थितीवर लक्ष ठेवून असेल. कोविडचा प्रसार वाढू नये यासाठी नागरिकांनी कोविड अनुकूल व्यवहार करण्यावर भर दिला पाहिजे. कोविड कालावधीत उभारण्यात आलेली फिल्ड रुग्णालये व्यवस्थित आहे का पहा. त्यांचे स्ट्रक्चरल ऑडिट करुन घ्यावे. या ठिकाणी वैद्यकीय कर्मचारी आहेत का, आवश्यक पायाभूत सुविधा आहेत का याचा आढावा घ्यावा, अशा सूचना आरोग्य विभागाला दिल्या. कोविड चाचण्यांचे प्रमाण कमी झाले आहे. हे प्रमाण वाढविण्यासाठी प्रयत्न करायला हवेत. कोविड विषाणूचा नवीन व्हेरियंट आहे का, असल्यास त्याची संसर्ग क्षमता किती आहे, यावर लक्ष ठेवा, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

लवकरच शाळा सुरू होतील. शाळेच्या बाबत जागतिक स्तरावर काय निर्णय घेतले गेले आहेत, तेथील मुलांना संसर्ग होण्याची स्थिती काय आहे, याबाबत माहिती घ्यावी, असेही मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांनी सांगितले. यावेळी कोविड टास्क फोर्स चे अध्यक्ष डॉ. संजय ओक, डॉ. अजित देसाई, डॉ. बजान, डॉ. शशांक जोशी, डॉ. राहुल पंडित, डॉ. वसंत नागवेकर, डॉ. तात्याराव लहाने यांनी दूरदृष्यप्रणालीव्दारे आपली मते मांडली.

# रामशेठ ठाकूर यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव



**दै.रायगड नगरी । पनवेल**

अफाट लोकप्रियता असलेले लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे ७१ व्या वाढदिवसानिमित्त सामाजिक, शैक्षणिक, कला, क्रीडा, राजकीय, वैद्यकीय अशा विविध क्षेत्रातील मान्यवरांसह हितचिंतक नागरिकांनी अभिष्टचिंतन करून शुभेच्छांचा वर्षाव केला.

सर्वसामान्यांचा आधारवड असलेले लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी नेहमीच समाजातील प्रत्येक घटकासाठी मदतीचा ओघ दिला .../२

# रायगड नगरीचा बांबू लागताच पनवेल शहरात पाणी पुरवठा सुरळीत

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहरात गेले दोन महिन्यापासून अनियमित पाणी पुरवठा होत होता. नागरिकांना पाण्याची वणवण करावी लागत होती. परंतु रायगड नगरीने ३१ मे २०२२ रोजीच्या वृत्तपत्रात पहिल्या पानावर ''सत्ताधाऱ्यांनी पनवेलकरांच्या तोंडचे पाणी पळविले'' या मथळ्याखाली वृत्तपत्र प्रसिद्ध केले होते. त्या वृत्ताने खळबळ उडून विरोधी पक्ष आणि सत्तारुढ पार्टी खडबडून जागे झाले आणि शहरात पूर्ववत नियमित पाणी पुरवठा उच्च दाबाने सुरू झाला. रायगड नगरीच्या वृत्ताची दखल सत्ताधाऱ्यांनी आणि विरोधकांनी घेतल्यामुळे रायगड नगरीचा दबदबा काय आहे? याची प्रचिती पनवेल शहरातील नागरिकांना आलेली आहे.

पनवेल शहरात गेल्या दोन महिन्यापासून अनियमित पाणीपुरवठा होत होता. सुरूवातीला एक दिवसाआड पाणी येणार अशी पनवेल महानगरपालिकेने घोषणा केली. नागरिकांनी सामजंस्याची भूमिका घेवून त्याला दुजोरा दिला. परंतु एक दिवसआड येणारा पाणी पुरवठा हा सुद्धा अनियमितपणे होवू लागला. त्यानंतर एक दिवसाआड ऐवजी दोन दिवस होवून देखील पाणी पुरवठा होत नव्हता. याच्या तक्रारी रायगड नगरीच्या मोबाईलवर ९२२३३४५२४९ यावर येण्यास सुरूवात झाली.

त्यावेळी प्रत्येक नागरिक म्हणू लागले की, रायगड नगरी जनतेचा आवाज उठविण्याचे वृत्तपत्र आहे, असे असताना आज रायगड नगरीमध्ये शहरातील पाणी पुरवठा प्रकरणी वृत्त का प्रसिद्ध होत नाही, अशा प्रकारच्या तक्रारी आल्यानंतर रायगड नगरीचे मुख्य संपादक सुनील पोतदार यांनी याबाबत दि.३१ मे २०२२ रोजीच्या वृत्तपत्रात सडेतोड वृत्त प्रसिद्ध केले. आणि त्या वृत्ताची दखल घेवून सत्ताधारी आणि विरोधकांनी मिलीजुली सरकार बाजूला ठेवून जनतेच्या हिताचा प्रश्न (पाणी प्रश्न) तो नियमित केलेला आहे, असे दिसते. याबाबत दै.रायगड नगरीचे पनवेल शहरातील नागरिकांमधून अभिनंदन करण्यात आले. परंतु याबाबत सत्ताधारी आणि विरोधकांनी पुन्हा हा पाण्याचा प्रश्न निर्माण केला तर सत्ताधाऱ्यांचे आणि विरोधकांचे लक्तरे बाहेर काढण्यासाठी रायगड नगरी सज्ज आहे, असा इशारा रायगड नगरीचे मुख्य संपादक सुनील पोतदार यांनी दिलेला आहे.

# लाल परी, मैदान खडी

चालक तुकाराम पाठारे आणि वाहक लक्ष्मण केवटे यांनी 'बॉम्बे स्टेट रोड ट्रान्सपोर्ट कॉर्पोरेशन'ची पहिली बस पुणे–अहमदनगर या मार्गावर चालवली, त्याला एक जून रोजी ७४ वर्षे पूर्ण झाली. या कॉर्पोरेशनचे पुढे 'महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ' झाले. 'एसटी' या नावाने लोकप्रिय झालेल्या आणि सर्वसामान्यांच्या भावविश्वाचा भाग होऊन बसलेल्या या सेवेने अमृत महोत्सवी वर्षात पदार्पण केले आहे. 'लाल परी', 'लाल डबा' अशा प्रेमळ नावांनीही परिचित झालेली ही सेवा आज पंचाहत्तराव्या वर्षात जीर्णोद्धाराच्या प्रतीक्षेत असून, खासगीकरणाच्या सावटाखाली आपले अंग चोरून उभी आहे. पाच महिन्यांच्या दीर्घ संपकाळात नको त्या नेतृत्वाच्या आहारी जाऊन काही कर्मचाऱ्यांनी तुटेपर्यंत ताणल्यामुळे, ती आता सामान्यांची सहानुभूतीही गमावते आहे; मात्र तरीही गेल्या अनेक वर्षांत लहान लहान गावे आणि माणसे आपल्या मार्गांनी जोडत जमा केलेल्या चांगुलपणाचे संचित एसटीकडे अजून कायम आहे. डबल बेल आणि सिंगल बेल देत, दांड्यावर चिमट्याचा आवाज काढत, बॉलपेन कानांच्या खोबणीत ठेवत शेकडो वाहकांनी लाखो प्रवाशांशी साधलेल्या संवादाचे सौहार्द अजून शिल्लक आहे. समस्या मोठ्या आहेत, संकटांची मालिका कायम आहे; तरीही या आपुलकीच्या बळावर एसटीचा भविष्यकाळ बहराला येऊ शकतो. त्यासाठी गरज आहे नव्या विचारांची आणि ते प्रत्यक्षात आणण्याच्या निर्धाराची. 'एसटी तोट्यात' हे ऐकण्याची कानांना आणि वाचण्याची डोळ्यांना आता सवय झाली आहे. एखादी सार्वजनिक सेवा तोट्यात असणे, यात काहीच नवल नाही; परंतु म्हणून त्या सेवेतील कर्मचाऱ्यांनीही कायम अभावाचे आयुष्यच जगले पाहिजे, अशी अपेक्षा पूर्णतः चूक आहे. तोट्यात असल्याची हाकाटी देऊन एसटीचे खासगीकरण करण्याचा डाव कोणाचाही असो, तो हाणून पाडला पाहिजे. अमृत महोत्सवी वर्षाचा मुहूर्त साधून मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत एसटीची पहिली इलेक्ट्रिक बस सुरू झाली; त्यावेळी विलीनीकरणाच्या संदर्भात 'सुख हे मानण्यात असते' असे महत्त्वाचे बोल मुख्यमंत्र्यांनी एसटी कर्मचाऱ्यांना ऐकवले, ते बरे झाले. राजकीय सत्तासंघर्षाबाबतही तेच लागू केले, तर सत्ताधारी आणि विरोधक यांच्यातील सुंदोपसुंदी संपून अनेक प्रश्न मार्गी लागतील. एसटीच्या पंचाहत्तरीत परिस्थिती खूप बदललेली असून, वाहतुकीचे अनेक पर्याय समोर असताना तिची उपयुक्तता कायम ठेवण्याचे मोठे आव्हान समोर आहे. अनिवार्य आणि आवश्यक असलेल्या आधुनिकीकरणाकडे पहिले पाऊल म्हणून विचार केला, तर इलेक्ट्रिक बस हा अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे; मात्र सर्वांत मोठी समस्या आहे ती खासगी वाहतुकदारांशी स्पर्धा करण्याची आणि या स्पर्धेची मानसिकता महामंडळात झिरपवण्याची. वाढत्या लोकसंख्येची प्रवासाची गरज पूर्ण करण्यासाठी महामंडळाला आर्थिक बळ देण्याऐवजी, काही मार्गांवर खासगी वाहतुकीला परवानगी देण्याचा निर्णय १९९२मध्ये झाला; तोच एसटीच्या मुळावर आला. भाडेकरूनेच घर ताब्यात घ्यावे, तसा या खासगी वाहतूकदारांनी प्रवाशांचा कब्जा घेतला. एसटी महामंडळाच्या आजवरच्या कारभाऱ्यांनी स्वतःच अनेकदा खासगी वाहतूकदारांच्या हिताचे निर्णय घेतले आणि एसटीला स्पर्धेत मागे राहू दिले. एके काळी दिवसाला ६०–६५ लाख प्रवाशांची ने–आण करणारी एसटी आज केवळ ३० लाख प्रवाशांची वाहतूक करते. एसटीचे उत्पन्न दिवसाला १८–१९ कोटी रुपयांच्या आसपास रेंगाळत असताना, खासगी क्षेत्र दररोज ३०–३२ कोटी रुपये तिजोरीत जमा करीत आहे. एसटीच्या साडेतीन हजार बस भंगारात निघाल्या आहेत आणि ज्या आहेत त्यांची अवस्था लाल परीचे लाल डब्यात रूपांतर झाल्याचे सिद्ध करणारी आहे. राज्यभरात एसटी महामंडळाच्या ताब्यात असलेल्या भूखंडांकडे राज्याचे कारभारी व त्यांचे शिलेदार एसटीला पुन्हा ऊर्जितावस्था आणण्याचे साधन म्हणून पाहतात, की स्वविकासाचे साधन म्हणून पाहतात, यावर एसटीची पुढील वाटचाल कशी होते ते ठरेल. या जागांचा नीट व्यापारी उपयोग केला, तर एसटीला निधीची चणचण भासणार नाही. स्वच्छ, उत्तम आणि सोयीची सेवा ही आजच्या प्रवाशांची मागणी असून; त्यासाठी आर्थिक तरतुदीपेक्षा निर्धाराची आणि आखणीची अधिक गरज आहे. खासगी वाहतूक आता पूर्ण बंद होणे शक्य नाही; मात्र लांबच्या मार्गावर त्याच तोडीची, थोडी स्वस्त आणि विश्वासार्ह सेवा दिली गेली, तर प्रवासी नक्कीच एसटीला पसंती देतील. बसस्थानकांमधील स्वच्छतकेडे लक्ष दिले, कँटिनमधील पदार्थांचा दर्जा राखला गेला आणि एसटी स्थानकांवर मनोरंजनाची, संपर्काची आधुनिक साधने उपलब्ध झाली, तर एसटीचा शतक महोत्सव नक्कीच दमदार होईल. 'सुख मानण्यात असते' असेच प्रवाशांनाही सांगितले गेले, तर मात्र डेपोत उदासपणे उभ्या असलेल्या बसची संख्या वाढत राहील आणि 'लाल परी, मैदान खडी' म्हणायची वेळ येई. तशी वेळ सरकारने येऊ देऊ नये.

# प्रभू रामचंद्रांचे चारित्र्य आणि श्रीकृष्णाच्या राजनीतीचा संगम म्हणजे शिवचरित्र : पांडुरंग बलकवडे

**दै.रायगड नगरी । कर्जत**

जिजाऊंच्या संस्कारामुळे शिवराय घडले. पहिल्यांदा ते स्वतः आदर्शमय जीवन जगले. त्यांचा गनिमी कावा, त्यांची अगदी कमी मावळ्यांसोबत बलाढ्य शत्रूंचा पराभव करण्याची युद्धनीती, प्रत्यक्ष औरंगजेबाच्या दरबारातील त्यांचा बाणेदारपणा त्याचा झालेला परिणाम हे सारे आपल्याला माहीत आहे. प्रभू रामचंद्रांचे चारित्र्य आणि श्रीकृष्णाच्या राजनीतीचा संगम म्हणजे शिवचरित्र' असे महत्वपूर्ण प्रतिपादन भारत संशोधन इतिहास मंडळाचे चिटणीस पांडुरंग बलकवडे यांनी येथे केले.

कर्जत शहरातील रॉयल गार्डनच्या सभागृहात राहुल वैद्य लिखित श्री शिवकाव्य या काव्य संग्रहाच्या प्रकाशन समारंभाचे आयोजन केले होते. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते दीप प्रज्वलित करून समारंभाचे उदघाटन केले. याप्रसंगी नगराध्यक्ष सुवर्णा जोशी, पनवेल महापालिकेचे गटनेते परेश ठाकूर, इतिहास संशोधक पांडुरंग बलकवडे, मुंबई विद्यापीठाच्या पुरातत्व विभागाच्या प्राध्यापिका प्राची मोघे, इतिहास अभ्यासक सागर सुर्वे, जितेंद्र ओसवाल, भाई गायकर, मोहन ओसवाल आदी व्यासपीठावर उपस्थित होते.

बलकवडे पुढे म्हणाले, ज्याने आपल्या पित्याला आयुष्यभर तुरुंगात ठेवले, आपल्या भावांना मारले, आपल्या थोरल्या भावजईवर बलात्कार केला व तिला जनानखन्यात ठेवले. आपल्या मुलाला विषप्रयोगाने मारले. आता आमच्याकडे काय विचार सुरू आहे? त्या औरंगजेबाच्या खुलदाबाद मधील थडग्याच्या दर्शनासाठी जातायत. त्याला सुफी संत ठरवण्याचा प्रयत्न करतात. पण मी त्यांना सांगतो. औरंगजेब हा जगातील कोणत्याही मानवी समाजासाठी आदर्श ठरू शकत नाही. जर याला आदर्श ठरविण्याचा प्रयत्न केला तर तुम्ही आदर्श ठरू शकणार नाहीत, तुमचा समाज, तुमचा धर्म, तुमची संस्कृती आदर्श ठरू शकत नाही.' असे स्पष्ट करून 'आज प्रकाशित केले ते श्रीशिवकाव्य सर्वसामान्यांना नक्की मार्गदर्शक ठरेल. ते नक्की जगप्रसिद्ध होईल.' असा विश्वास व्यक्त केला.

सुरुवातीला राहुल वैद्य आणि रीना वैद्य यांनी उपस्थितांचे स्वागत केले. त्यांनतर 'श्री शिवकाव्य' या काव्य संग्रहाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. प्रस्ताविकात वैद्य यांनी श्री शिवकाव्य करण्याची प्रेरणा कशी मिळाली? हे सांगितले. परेश ठाकूर यांनी, छत्रपती शिवाजी महाराजांनी मराठी भाषा समृद्ध केली.' असे सांगितले. नगराध्यक्ष सुवर्णा जोशी यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. आमदार प्रशांत ठाकूर यांनी आपल्या मनोगतात, 'छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने आपली भूमी पुनीत झाली आहे. शिवाजी महाराज जे जीवन जगले त्या संपूर्ण जीवनामध्ये एक एका प्रसंगांमध्ये पुढच्या पिढ्यांपिढ्यांना एक नवा आदर्श घालून दिला. आज लोकशाही व्यवस्थेमध्ये आपण सारे जण वावरतो. त्या लोकशाही व्यवस्थेमध्ये अनेक वेळा अनेक गोष्टींचा बाबतीत ज्यांच्या हातात सतट सूत्र असतात ते समोरच्याला जुमानत नाहीत. ही प्रवृत्ती आपल्याला पाहायला मिळते. सत्तेच्या मस्ती मध्ये तो इतका मग्रूर होऊन जातो. त्याचा आणि सर्वसामान्यांच्या नातेसंबंध कनेक्ट तुटतो. त्यातून त्याची अधोगतिकडे वाटचाल सुरू होते. हे लोकशाहीत घडते महाराजांनी पारतंत्र्यातील मराठी मुलखाला आम्ही स्वतंत्र राज्य बनवू शकतो याची प्रेरणा दिली आणि अनेक लढायांमध्ये स्वतः पुढाकार घेऊन अनेक लढाया जिंकल्या व त्यातून जे स्वराज्य निर्माण केले. त्या स्वराज्यामध्ये निर्णयाचे अधिकार, राज्य चालवण्याचे अधिकार म्हणून ज्या व्यवस्था निर्माण केल्या त्या आजच्या लोकशाहीलाही लाजवतील आशा पद्धतीच्या होत्या म्हणून शिवरायांचे वेगळेपण देशात नव्हे तर जगात आहे.' असे स्पष्ट केले.

सूत्रसंचालन समीर खरे यांनी केले. केदार आठवले यांनी सादर केलेल्या पसायदानाने सोहळ्याची सांगता झाली. याप्रसंगी मकरंद पाध्ये, दीपक बेहेरे, मंदार मेहेंदळे, अविनाश कोळी,पराग बोरसे, अनुपमा कुळकर्णी, अभिषेक सुर्वे, रणजीत जैन, सचिन ओसवाल, मुकेश सुर्वे, राजीव मुळेकर, डॉ. आशुतोष कुळकर्णी, गणेश वैद्य, प्रकाश पटवर्धन, योगिता राणे, अक्षया चितळे, स्मिता जोशी, अभिषेक पटवर्धन, गणेश जगताप, निलेश चौडिये, संतोष दगडे आदी उपस्थित होते.

# पनवेल शहर पोलिसांनी केला १० हजार रुपये किमतीचा विमल गुटखा व सुंगधित तंबाखू हस्तगत

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या विशेषश पथकाने कारंजाडे येथे टाकलेल्या छाप्यात एका पान टपरी वाल्याकडून जवळपास ९० हजार ०६० रुपये किमतीचा बेकायदेशीररित्या जवळ बाळगलेला विमल गुटखा व सुंगधित तंबाखू हा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

करंजाडे आर ५ या ठिकाणी गोविंद राजभर (वय २४) हा त्याच्या पानटपरीवर बेकायदेशीररीत्या व शरीरास अपायकारक असलेला विमल गुटका व सुगंधित तंबाखू जवळ बाळगत असल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय कादबाने याना मिळताच त्यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि संतोष शेट्टे, सपोनि बजरंग राजपूत, पोलीस नाईक रवींद्र पारधी व त्यांच्या पथकाने सदर ठिकाणी छापा टाकून जवळपास ९० हजार ०६० रुपये किमतीचा बेकायदेशीररित्या जवळ बाळगलेला विमल गुटखा व सुंगधित तंबाखू हा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

या प्रकरणी सदर व्यक्ती विरुद्ध भादवी कलम ३२८,२७२,२७३ सह अन्न व नागरी सुरक्षा मानके अधिनियमन २००६ चे कलम ५९ प्रमाणे कारवाई केली असून याबाबत पुढील तपास सपोनि बजरंग राजपूत करीत आहेत.

# रामदास शेवाळे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून नवीन शिवसेना शाखेचे उदघाटन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगर प्रमुख रामदास शेवाळे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून कळंबोली बिमा कॉम्प्लेक्स येथे नवीन शिवसेना शाखेचे उदघाटन शिवसेना जिल्हाप्रमुख रायगड शिरीष घरत यांच्या शुभ हस्ते करण्यात आले. तसेच या प्रसंगी महानगर प्रमुख रामदास शेवाळे यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे जिल्हासंपर्क प्रमुख बबनदादा पाटील तसेच उपजिल्हाप्रमुख रामदास पाटील, तालुका संघटक भरत पाटील, विधानसभा संघटक दिपक निकम, विधानसभा समन्वयक प्रदीप ठाकूर, उपमहानगर प्रमुख कैलास पाटील, रामदास गोंधळी, कळंबोली शहर प्रमुख डी.एन.मिश्रा, युवासेना उपजिल्हा अधिकारी अवचित राऊत, आदि पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# उरणकरांना रेल्वेची प्रतीक्षा कायम : डेडलाईन पुन्हा हुकण्याची भीती?

**दै.रायगड नगरी । उरण**

सिडको व रेल्वेच्या भागीदारीत सुरू करण्यात आलेल्या १७८२ कोटी खर्चाच्या नेरुळ – उरण हा २७ किमी लांबीचा हा अत्यंत महत्त्वाकांक्षी प्रकल्प आहे. या नियोजित प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यातील काम पूर्ण करुन रेल्वे मार्गावर प्रवासी वाहतूक सेवा सप्टेंबर २०२२ पर्यंत सुरू करण्याची दिलेली डेडलाईनसाठी अद्याप चार महिन्यांचा अवकाश आहे. मात्र सध्या तरी गतीने सुरू असलेले काम पावसाळ्यात मंदावण्याची शक्यताच अधिक असल्याने डेडलाईन पुन्हा हुकण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. यामुळे ५० वर्षांपासून प्रतिक्षेत असलेल्या उरणकरांना नेरुळ – उरण रेल्वे मार्गावर रेल्वे धावण्याची आणखी वाट पहावी लागते की काय अशी भीती व्यक्त केली जात आहे.

नेरुळ – उरण या २७ किमी लांबीच्या महत्त्वाकांक्षी रेल्वे मार्गाला १९६७ सालीच मंजुरी मिळाली आहे. मात्र रेल्वे मार्गाला सुरुवात करण्यासाठी तब्बल २२ वर्षं वाट पाहावी लागली आहे. सुरुवातीला रेल्वे मार्गाचा अंदाजे खर्च ४९८ कोटी होता. मात्र सातत्याने झालेल्या कामाच्या विलंबामुळे कामाचा खर्च आता १२८४ कोटींनी वाढून १७८२ कोटींच्या घरात पोहचला आहे. यामध्ये आणखी वाढ होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

२०११ सालापासून सुरू झालेल्या या रेल्वे मार्गावरील प्रकल्पाचे काम रखडत रखडत सुरु आहे. कधी वन, पर्यावरण, खारफुटींचे तर खासगी जमिनी संपादित करण्यासाठी शेतकऱ्यांकडून होणारा विरोध यामुळे पहिल्याच टप्प्याचे काम पूर्ण होण्यासाठी २०१८ पर्यंत वाट पाहावी लागली. या पहिल्या टप्प्यातील २७ किमी लांबीच्या या रेल्वे मार्गावरील ११ स्थानकांपैकी नेरुळ, सीवूड, सागर संगम, बेलापूर, तरघर, बामणडोंगरी, खारकोपर अशा १२.५ किमी अंतरापर्यंत रेल्वे प्रवासी वाहतूक सुरू करण्यात आली आहे.



त्यानंतर उर्वरित गव्हाण,रांजणपाडा, न्हावा–शेवा, द्रोणागिरी, उरण या स्टेशन दरम्यान १५ किमी लांबीच्या रेल्वे मार्गावरील दुसऱ्या टप्प्यातील रखडलेल्या कामातील विविध अडथळे दूर करण्यात आले आहेत. त्यामुळे स्टेशन उभारणी, रेल्वे ट्रॅक टाकणे, ओव्हरहेड वायर, उड्डाण पूल उभारण्याच्या कामांनी वेग घेतला आहे.कामात होणारा विलंब खर्चाच्या वाढीस कारणीभूत ठरत असल्याने मध्यरेल्वे प्रशासनानेही कामाचा वेग वाढविला आहे. मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक अनिलकुमार लाहोटी यांनीही दुसऱ्या टप्प्यातील रखडलेली कामे पूर्ण करुन नेरुळ–उरण रेल्वे मार्गावर प्रवासी वाहतूक सेवा सुरू करण्याची २२ सप्टेंबर २०२२ पर्यंतची डेडलाईन याआधीच जाहीर केली आहे.

प्रत्यक्षात पाहणीनंतरही गव्हाण, रांजणपाडा, न्हावा–शेवा, द्रोणागिरी, उरण या स्टेशन दरम्यान १५ किमी लांबीच्या रेल्वे मार्गावरील दुसऱ्या टप्प्यातील कामे गतीने सुरू असल्याचे दिसून येत आहेत. मात्र स्टेशन उभारणीची बरीचशी कामे अपुर्ण अवस्थेत आहेत. डेडलाईन पाळण्याची मुदत आणखी चार महिने शिल्लक आहेत. कामाचा उरक पाहाता चार महिन्यांत कामे पुर्णत्वास जातीलच याची शाश्वती देण्यास ठेकेदार तयार नाहीत. त्यातच आठवडाभरात पाऊस येऊन ठेपणार आहे. पावसाळ्या दरम्यान आता सुरू असलेली कामाची गती कायम राखणे अवघड होणार असल्याचेही काही ठेकेदारांचे म्हणणे आहे. त्यामुळे डेडलाईन पुन्हा हुकण्याची शक्यताच उरणकरांकडून व्यक्त केल्या जात आहेत. यामुळे ५० वर्षांपासून प्रतिक्षेत असलेल्या उरणकरांना नेरुळ – उरण रेल्वे मार्गावर रेल्वे धावण्याची आणखी वाट पहावी लागते की काय अशीही भीती उरणकरांना लागुन राहिली आहे. नेरुळ – उरण रेल्वे मार्गावर प्रवासी वाहतूक सुरू करण्यासाठी सप्टेंबर २०२२ पर्यंतची डेडलाईन पाळण्यासाठी सर्वच पातळीवर कसोशीने प्रयत्न केले जात असल्याची प्रतिक्रिया मध्य रेल्वेचे वरिष्ठ जनसंपर्क अधिकारी अनिल कुमार यांनी दिली.

# रोहा सिटीझन फोरम आयोजित नेत्र तपासणी शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

## १४१ रुग्णांनी केली तपासणी ; ४३ जणांना शास्त्रक्रियेसाठी पनवेलला पाचारण

**दै.रायगड नगरी । रोहा**

रोह्यातील सामाजिक संस्था रोहा तालुका सिटीझन फोरम ट्रस्ट (रजि.) आणि नविन पनवेल येथिल आर झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटल यांच्या वतीने आयोजित मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिरात १४२ रुग्णांची तपासणी करण्यात आली तर ४३ जणांना मोतीबिंदू शास्त्रकियेसाठी नवीन पनवेल येथिल हॉस्पिटलमध्ये पाठविण्यात आले.

रोहा येथिल श्री धावीर देवस्थानाच्या प्रांगणात आयोजित या शिबिराच्या प्रारंभी काश्मिरमध्ये शहीद झालेल्या जवानांना उपस्थितांनी श्रद्धांजली वाहिली. यावेळी रोहा तालुका सिटीझंस फोरमचे अध्यक्ष नितीन परब, निमंत्रक आप्पा देशमुख, ज्येष्ठ पत्रकार दिलीप वडके, श्रीकांत ओक, ॲड मनोजकुमार शिंदे, महेश सरदार, राजेंद्र जाधव, संदीप सरफळे, इल्यास डबीर, निलेश शिर्के, अमोल देशमुख, सचिन शेडगे, प्रशांत देशमुख आदी उपस्थित होते. या शिबिरास माजी नगराध्यक्ष संजय कोनकर, समीर शेडगे, माजी उपनगराध्यक्ष अहमद दर्जी, उस्मान रोहेकर, ज्येष्ठ पत्रकार विजय देसाई, शैलेश रावकर, राजेश काफरे, परशुराम चव्हाण, भरत गुरव आदींसह तालुक्यातील अधिकारी वर्ग व रोह्यातली प्रतिष्ठित नागरिक, व्यापारी व समाजसेवी संस्थानी सदिच्छा भेट दिली.

शिबिरामध्ये आर झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटलचे टीम मॅनेजर प्रकाश पाटील, डॉ. वामसी कृष्णा, फॅबिना फर्नांडिस, गायत्री चौरसिया, अंजू पाल, लवप्रीत कौर, नरेश आवलर यांनी तपासणी काम पाहिले, तर रोहा सिटीझन फोरमचे दिनेश जाधव, भावेश अग्रवाल, दिनेश मोहिते, समिधा अष्टीवकर यांच्यासह आशा सेविका संजिवनी संजय चाळके, मंथना प्रफुल्ल झुरे, सिमरन सदानंद कडव, नलिनी नंदकुमार सावंत, सुप्रिया दिपक बठारे, प्रज्ञा लहाने, दिप्ती गुडेकर आदींनी विशेष परिश्रम घेतले. शिबिराच्या आयोजनासाठी नविन पनवेल येथिल आर झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटलचे प्रकाश पाटील आणि त्यांच्या टीमने सहकार्य केले. या शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद दिल्याने रोहा तालुका सिटीझन फोरमचे अध्यक्ष नितिन परब यांनी सहयोगी सेवाभावी संस्थांचे आणि शिबिरासाठी परिश्रम घेणाऱ्या सर्वांचे आभार मानले आहेत.



# लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सर्वसामान्यांचे आधारवड व दानशूर व्यक्तिमत्व माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या ७१ व्या वाढदिवसानिमित्त भारतीय युवा मोर्चा पनवेल शहर व ग्रामीण तर्फे आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिराला रक्तदात्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या शिबिरात भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, शहर अध्यक्ष जयंत पगडे यांच्यासह ७१ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

पनवेल तालुका व शहर भाजपच्या मध्यवर्ती कार्यालयात झालेल्या या शिबिरास भाजपचे पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, महापालिकेचे सभागृहनेते परेश ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, नगरसेवक मनोज भुजबळ, नगरसेविका चारुशीला घरत, जिल्हा परिषद सदस्य अमित जाधव, पंचायत समिती सदस्य राज पाटील, भूपेंद्र पाटील, युवा मोर्चाचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, युवा मोर्चाचे शहर अध्यक्ष रोहित जगताप, तालुकाध्यक्ष आनंद ढवळे, युवा नेते दिनेश खानावकर, चिन्मय समेळ, गौरव कांडपिळे, मयूर कदम, आकाश भाटी, यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



पृष्ठ क्र.१ वरुन...

# वाढदिवसानिमित्त लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव

आहे. महापूर असो वा कोरोना वैश्विक महामारी किंवा कुठलीही आपत्ती लोकांवर आलेले संकट आपले आहे, असे मानून लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सतत कार्य केले आहे. वाढदिवसाचे निमित्त असले तरी वर्षभर विविध समाजोपयोगी उपक्रम राबविणारे महाराष्ट्रातील उतुंग व्यक्तिमत्व म्हणून सुपरिचित आहेत. मागील वर्षी कोरोना वैश्विक महामारीच्या अनुषंगाने वाढदिवस घरगुती व साध्यापणाने साजरा झाला असला तरी तब्बल ०१ लाख कुटुंबांना सामाजिक बांधिलकीतून जीवनावश्यक वस्तू तसेच कोरोनाच्या अनुषंगाने वैद्यकीय सामुग्री देऊन त्या कुटुंबाचे जीवन सुरक्षित केले होते. यंदा वाढदिवसानिमित्त ज्येष्ठ कीर्तनकार व प्रवचनकार यांचा सन्मान सोहळा, ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार, रक्तदान शिबीर, रुग्णवाहिका लोकार्पण, मी मराठी सांस्कृतिक कार्यक्रम, आरोग्य शिबिरे, शालेय साहित्य वाटप, विकासकामांचे लोकार्पण व भूमिपूजन, अशी विविध समाजोपयोगी कार्यक्रम आयोजित करण्यात आली.वाढदिवसानिमित्त शुभेच्छा पनवेल येथील निवासस्थानी देऊ नये असे आवाहन करण्यात आले होते, मात्र सकाळपासूनच विविध क्षेत्रातील मान्यवरांसह पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिकांनी अभिष्टचिंतन करण्यासाठी गर्दी केली होती. त्यामुळे लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी त्या सर्वांचा मान ठेवत शुभेच्छांचा स्विकार केला. तत्पूर्वी लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या सुविद्य पत्नी शकुंतला ठाकूर, स्नुषा वर्षा ठाकूर, अर्चना ठाकूर यांच्यासह कुटुंबातील महिलांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे औंक्षण केले.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू–२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई–४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल–४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स–२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा–पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## आदई व नेवाळी येथे विविध विकासकामांचे भूमिपूजन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

आदई ग्रामपंचायतीचे सरपंच रमाकांत हशा गरुडे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून त्यांनी स्वखर्चाने नेवाळी येथे स्मशानभूमी पत्र्याचे शेड बांधण्याचे ठरवले आहे. या पत्र्याच्या शेडचे भूमिपूजन १ जून रोजी माजी सभापती काशिनाथ पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच नेवाळी येथे सार्वजनिक तलाव संरक्षण भिंत बांधण्याचा भूमिपूजन देखील करण्यात आले.

आदई गावदेवी मंदिर ते स्मशानभूमी आदई रस्त्याचे उद्घाटन व बौद्धवाडी समाज मंदिरचे भूमिपूजन यावेळी करण्यात आले. यावेळी काशिनाथ पाटील यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला पंचायत समितीचे माजी सभापती काशिनाथ पाटील, सरपंच रमाकांत गरुडे, भगवान कमलाकर पाटील, विलास परशुराम शेळके, राजेश केणी, गणू महादु पाटील– तंटामुक्ती अध्यक्ष आदी उपस्थित होते.

## विनाकारण फिरणाऱ्या व्यक्तींवर पोलिसांचा कारवाईचा बडगा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल परिसरासह इतर ठिकाणी मध्यरात्री विनाकारण फिरणाऱ्यांवर पोलिसांनी कारवाई सुरु केल्याने निशाचर लोकांचे धाबे दणाणले आहेत. कळंबोली स्टील मार्केट परिसरात सात जणांना ताब्यात घेऊन त्यांच्यावर गुन्हा दाखल कला आहे.

पनवेल शहर परिसरासह कळंबोली पोलीस स्टेशनचे गस्ती पथक स्टील मार्केट परिसरात गस्त घालत असताना, रात्री १ ते २ दरम्यान विनाकारण फिरणाऱ्यांची चौकशी सुरु केली. पोलिसांना पाहून पळून जाण्याचा प्रयत्न करणाऱ्यांना ताब्यात घेऊन चौकशी केली. अंधारात लपण्याचे व पळून जाण्याचे योग्य उत्तर न देता आल्यामुळे, त्यांच्यावर मुंबई पोलीस ॲक्ट कलम १२२ क अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी सुरु केलेल्या कारवाईमुळे रात्री अनावश्यकपणे शहरात फिरणाऱ्यांचे धाबे चांगलेच दणाणल्याचे पाहायला मिळत आहे.

## महाराणा प्रतापसिंह यांच्या जयंती निमित्ताने जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

महापराक्रमी महाराणा प्रतापसिंह यांच्या जयंती निमित्ताने आज जिल्हाधिकारी कार्यालयात महाराणा प्रतापसिंह यांच्या प्रतिमेला उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) सर्जेराव मस्के–पाटील यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी तहसिलदार न्यानदेव पवार तसेच जिल्हाधिकारी कार्यालयातील कर्मचारी उपस्थित होते.

### लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून

# महापालिका क्षेत्रातील ग्रामीण भागात ४ कोटी ७३ लाख रुपयांच्या विकासकामांचे भूमिपूजन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सर्वसामान्यांचे आधारवड असलेले दानशूर व्यक्तिमत्व माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या ७१ व्या वाढदिवसाचे औचित्य साधून पनवेल महानगरपालिकेच्या माध्यमातून महापालिका क्षेत्रातील पेंधर, ओवे, धरणा कॅम्प, पिसार्वे, तुर्भे, घोटचाळ, घोट, नागझरी, देवीचापाडा, पालेखुर्द या ग्रामीण भागात करण्यात येणाऱ्या एकूण ४ कोटी ७३ लाख रुपयांच्या विकासकामांचे भूमिपूजन भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर व तालुकाध्यक्ष अरुणशेठ



भगत यांच्या प्रमुख उपस्थितीत आज (दि.०२) करण्यात आले.

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती 'अ' मधील पेंधर गावातील रस्त्यांचे कॉक्रीटीकरण व गटार बनविणे, प्रभाग क्रमांक ३ मधील ओवे गावात नवीन जलवाहिन्या टाकणे, प्रभाग क्रमांक १ मधील धरणा कॅम्प गावातील अंतर्गत गटारे बांधणे, पिसार्वे गावातील रस्त्यांचे कॉक्रीटीकरण व गटार बनविणे, तुर्भे गावातील रस्त्यांचे कॉक्रीटीकरण व गटार बनविणे, घोटचाळ गावातील रस्त्यांचे काँक्रीटीकरण करणे, घोट गावातील रस्त्यांचे काँक्रीटीकरण करणे व आरसीसी गटार बांधणे, नागझरी गावातील रस्त्यांचे काँक्रीटीकरण करणे, प्रभाग क्रमांक २ मधील देवीचापाडा येथे गटार बांधणे, रस्ता डांबरीकरण आणि समाज मंदिराचे बांधकाम करणे, तसेच पालेखुर्द गावातील गणेश मंदिर ते स्मशानभूमी पर्यंत रस्त्याचे डांबरीकरण आणि आरसीसी गटार बांधणे या विकासकामे करण्यात येणार असून या कामांचे भूमिपूजन संपन्न झाले.

या भूमिपूजन सोहळ्यास उपमहापौर सीता पाटील, स्थायी समिती सभापती नरेश ठाकूर, प्रभाग समिती सभापती संजना कदम, नगरसेवक हरेश केणी, संतोष भोईर, दिनेश केणी, भाजपचे तालुका उपाध्यक्ष सचिन पाटील, मन्सूर पटेल, कृष्णा पाटील, गौरव भोईर, विनोद पाटील, राम पाटील, अशोक साळुंखे, युवा नेते दिनेश खानावकर, नंदकुमार म्हात्रे, समीर कदम, संतोषबुवा पाटील यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थ उपस्थित होते.

## सेवा निवृत्त होईपर्यंत असे चोख काम करा जे सर्व सामान्य नागरीकांच्या स्मरणात राहील : आयुक्त गणेश देशमुख

**दै.रायगड नगरी । अरविंद पोतदार**

**पनवेल** : पनवेल महानगरपालिकेचे सहाय्यक आयुक्त सुनिल मानकामे हे नुकतेच सेवानिवृत्त झाले या सेवानिवृत कार्यक्रमाचा निरोप समारंभ पनवेल येथिल वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात अतिशय आनंददाई वातावरणात साजरा झाला.

या निरोप समारंभाच्या कार्यक्रमात दस्तुरखुद्द पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त गणेश देशमुख उपायुक्त सचिन पवार,उपायुक्त कैलास गावडे,उपायुक्त गणेश शेट्ये आदी मान्यवर उपस्थित राहील्याने या कार्यक्रमास एक वेगळीच अतुलनिय झलक तेथे उपस्थित महानगरपालिकेचे कर्मचारी इतर अधिकारी मानकामे यांचे मित्रपरिवार यांना पहावयास मिळाली. त्यातच सुनिल मानकामे बरोबरच इतरही अन्य तीन सेवानिवृत्त कर्मचारी यांचाही निरोप संमारंभ या ठिकाणी यथोचित शाल श्रीफळ प्रदान करून करण्यात आला. अनेक अधिकारी व निवृत कर्मचारी यांनी सत्कार मुर्ती यांच्या आता पर्यंतच्या त्यांच्या महानगरपालिकेतील कामाची वाहवा तसेच काही मजेदार किस्सेही काहीने यावेळी कथन केले. यात कर विभागातील निवृत कर्मचारी सतीश जोशी तसेच सुनिल खेडेकर यांनी मानकामे सोबत काम करण्यात कसा ते आमचा आत्मविश्वास वाढवत असत तसेच कामातील बारकावे कसे हाताळुन हातातील कामाची कशी पुर्तता करावी याची अनेक उदाहरणे अनुभवातुन कथन केली

पनवेल महानगरपालिकेचे गणेश देशमुख आयुक्त हे या निरोप समारंभ आल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या व त्यांच्या खुमासदार निरोप समारंभाच्या भाषणशैलीत अनेक पैलु न कळत नकळत महानगरपालिकेतिल कार्यरत इतर सेवेतील कर्मचारी अधिकारी व अन्य पालीकेतील पदाधिकारी यांना एक सुखद धक्काच देऊन गेले आयुक्त गणेश देशमुख यांनी आपल्या भाषणात सुनिल मानकामे यांच्या आतापर्यंतच्या अभ्यासु व टेक्नीकल कामाचे तोंडभरून कौतुक केले. अगदी पालीकेच्या कामकाजाच्या वेळेनंतरही सुनिल मानकामे रात्री ८ वाजपर्यतही पालीकेचे काम करीत असल्याने



त्यांनी कधी घरी जाण्यासाठी घाई केली नाही. एक जबाबदार व्यक्तीमत्व असाच उल्लेख करून त्यांच्या आई व संपुर्ण कुटुंबाचीही आयुक्त गणेश देशमुख यांनी वाहवा केली. इतर अधिकारी व कर्मचारी यांना उद्देशुन आपणही सुनिल मानकामे सारखे आपल्या कामात पारदर्शकता व सचोटीने नागरीकांच्या कामास प्रथम योग्य प्राधान्य द्यावे असे संबोधुन अतिशय हुशार व अभ्यासू सुनिल असल्यानेच आज मी या निरोप समारंभाला आवर्जून आलो असल्याचे आयुक्त गणेश देशमुख यांनी सांगितले. प्रत्येकाने आपल्या कामाची जबाबदारी ओळखुन चांगले काम केले तर माझ्यासारखा अधिकारी त्याच्या कामाची पोच पावती द्यायला कधीही विसणार नाही असे आयुक्त गणेश देशमुख यांनी निक्शुन सांगितले तसेच आयुक्त गणेश देशमुख यांच्या हस्ते सुनिल मानकामे लिखीत श्री बाबा अमरनाथ एक संस्मरण या पुस्तकाचे प्रकाशन आयुक्त गणेश देशमुख यांच्या हस्ते यावेळी करण्यात आले. या कार्यक्रमात रविंद्र चोणकर, शैलेश गायकवाड,एल.बी.टी.विभाग प्रमुख हरिश्चंद्र कडु, अनिल जाधव, अमर पाटील तसेच महानगरपालिका कर्मचारी सत्कार मुर्तीचे परीवार अन्य अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## खारघर वसाहती मधील नागरी समस्या त्वरीत सोडविण्याची राष्ट्रवादीची मागणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

खारघर वसाहती मधील नागरी समस्या त्वरीत सोडविण्याची राष्ट्रवादी युवक काँग्रेस च्या पदाधिकाऱ्यांनी पनवेल महानगर पालिकेकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे रायगड जिल्हा अध्यक्ष तथा पनवेल महानगरपालिकेचे नगरसेवक सतीश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल महानगर पालिकेच्या अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांची भेट घेतली. या वेळी राष्ट्रवादी युवक काँग्रेस चे कार्याध्यक्ष शहबाज फारूक पटेल यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते, लवकरच पावसाळा सुरु होत आहे या पावसाळ्यामध्ये खारघर मधील सर्वच रस्त्यावर झाडांची वाढ झाली आहे. या वाढलेल्या फांद्या किंवा झाडांची पाने यांची छाटणी करणे अत्यंत गरजेचे आहे. खारघर हिरानंदानी पासून ते सेक्टर ४० पर्यंत रस्त्यावर असणाऱ्या झाडांच्या फांद्या वेळोवेळी छाटणे गरजेचे बनले आहे त्यामुळे अपघात टळण्यास मदत होणार आहे त्याचप्रमाणे गटारांची साफसफाई, मोठे नाले साफ करणे, रस्त्यातील खड्डे बुजविणे आदी कामे पनवेल महानगर पालिकेने तातडीने करणे गरजेचे आहे तरी या नागरी समस्यांचे निराकरण करावे अशी मागणी राष्ट्रवादी युवक काँग्रेस चे कार्याध्यक्ष शहबाज फारूक पटेल यांनी या वेळी केली आहे.



# आ.अनिकेत तटकरे यांच्या हस्ते म्हसळा तालुक्यातील विविध विकास कामांचे उद्घाटन

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

खासदार सुनिल तटकरे, पालकमंत्री आदिती तटकरे, आणि आमदार अनिकेत तटकरे यांचे विशेष प्रयत्नामुळे आणि त्यांचे विकास निधींतून मंजुर करण्यात आलेल्या म्हसळा तालुक्यातील मेंदडी गणातील तुरुंबाडी,आडीठाकुर,रोहिणी, वारळ आणि मेंदडी येथील दोन कोटी रुपये खर्च करून मंजुरी देण्यात आलेल्या विविध लोकपयोगी विकास कामांचे उद्घाटन आमदार अनिकेत तटकरे यांचे हस्ते संपन्न झाले.



विकास कामांमध्ये प्रामुख्याने आडीठाकुर येथे सामाजिक सभागृह, रोहिणी येथे अंगणवाडी इमारत, रोहिणी आबाजी मंडळ सामाजिक सभागृह, ओमशिव कलापथक सभागृह, तुरुंबाडी नळपाणी पुरवठा योजना, शाळा सभागृह आणि सामजिक सभागृह उद्घाटन, मंचेश्वर मंडळ सामाजिक सभागृह उद्घाटन, प्राथमिक शाळा गृहाचे उद्घाटन, वारळ येथे श्री दत्त मंदिराकडे जाण्यासाठी रस्ता विकास भूमिपूजन आणि मोहल्लाकडे जाणाऱ्या रस्ता बांधकामाचे उद्घाटन, मेंदडी क्रांती नगर सामाजिक सभागृह उद्घाटन, मेंदडी येथे आगरी समाज लोकवस्ती असलेल्या पाणी पुरवठा योजनेचे उद्घाटन असे सुमारें दोन कोटी रुपयांचा खर्च करण्यात आलेल्या विविध लोकपयोगी विकास कामांचे उद्घाटन आमदार अनिकेत तटकरे यांच्या हस्ते मोठया थाटामाटात आणि आनंदी वातावरणात करण्यात आले.

कार्यक्रमाला ग्रामस्थांचा उत्साह पहाता आमदार अनिकेत तटकरे यांनी गेल्या १० ते १५ वर्षापूर्वी येथील गावागावात विकासाचा ठिगळ पडला होता त्या वेळेची विकासा बाबतची परिस्थिती अत्यंत कठीण असताना येथील जनतेने आमच्यावर कायम विश्वास ठेवून जनतेची सेवा करण्यासाठी कायम सहकार्य व साथ दिलीत त्या बद्दल धन्यवाद मानताना गाव विकास कामांत निधीची कमतरता पडू देणार असे आश्वासन दिले. आयोजीत उद्घाटन कार्यक्रमाला आमदार अनिकेत तटकरे यांचे समावेत राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अलीशेट कौचाली, तालुका अध्यक्ष समीर बनकर, रा.जि.प.सभापती बबन मनवे, समन्वय समिती अध्यक्ष नाझिम हसवारे, प.स.सभापती छाया म्हात्रे, उपसभापती संदीप चाचले, जमीर नजीर, ता.महीला अध्यक्षा रेश्मा काणसे, मिना टिंगरे, अनंत पाटील, सरपंच सुनीता नाकती, उपसरपंच गोपाळ ताम्हणकर, गटविकास अधिकारी वाय.एम.प्रभे, बांधकाम अभियंता मोरे, लहू शेट म्हात्रे, अनिल बसवत, जहुरभाई काझी, सतीश शिगवण, महेश घोले, गजानन पाखड, अनिल टिंगरे, अक्रमभाई साठविलकर, ग्रामस्थ आणि मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वाहन चालकाची अनुज्ञप्ती आता मिळणार ऑनलाईन : ॲड.अनिल परब

**दै.रायगड नगरी । मुंबई**

परिवहन विभागामार्फत देण्यात येणाऱ्या ११५ सेवांपैकी ८० सेवा ऑनलाईन पद्धतीने देण्यात येत आहेत. आता परिवहन प्राधिकरण (आरटीओ) कार्यालयात वाहन चालक (लायसन्स) अनुज्ञप्तीचे नुतनीकरण, दुय्यम वाहन चालक अनुज्ञप्ती, वाहन–चालक अनुज्ञप्तीमधील पत्ता बदल, दुय्यम वाहन नोंदणी प्रमाणपत्र, वाहन नोंदणी प्रमाणपत्राचा पत्ता बदल तसेच बाहेरील राज्यात जाण्यासाठी ना–हरकत प्रमाणपत्रासाठी जावे लागणार नाही. आता या सहा सेवा ऑनलाईन पद्धतीने सुरू करण्यात आल्या असल्याची माहिती परिवहन मंत्री ड. अनिल परब यांनी दिली.



परिवहन आयुक्त कार्यालयात आज या सहा सेवांचे लोकार्पण मंत्री श्री. परब यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी त्यांनी ही माहिती दिली. कार्यक्रमास परिवहन आयुक्त अविनाश ढाकणे, अप्पर परिवहन आयुक्त जितेंद्र पाटील, सह परिवहन आयुक्त दिनकर मनवर, एनआयसीचे तांत्रिक संचालक दीपक सोनार आदी उपस्थित होते. मंत्री श्री. परब म्हणाले, विभागामार्फत ११५ अनुज्ञप्ती, नोंदणी प्रमाणपत्र, परवाना संबंधित सेवा देण्यात येत असून, केंद्र शासनाच्या सूचनांनुसार ८० सेवा ऑनलाईन असून, आज सहा सेवा ऑनलाईन पद्धतीने सुरू केल्या आहेत. याचा तब्बल २० लाख लोकांना लाभ मिळेल. पारदर्शक सेवा नागरिकांना मिळावी यासाठी या सेवा आधारकार्डसोबत जोडण्यात आल्या असल्याचेही त्यांनी सांगितले.

अर्जदार अर्ज, पेमेंट व कागदपत्रे ऑनलाईन अपलोड करु शकतो. या सेवांचा लाभ घेण्याकरिता आधारक्रमांकचा वापर करण्यात येणार असून, आधारकार्डशी लिंक असलेल्या मोबाईलवर ओटीपी पाठविण्यात येणार, त्यानंतर त्याची नोंदणी परिवहन या संकेतस्थळामध्ये केल्यास अनुज्ञप्ती / नोंदणी प्रमाणपत्रामधील अर्जदाराची माहिती व आधार अभिलेखातील अर्जदाराची माहिती याची खातरजमा झाल्यानंतरच पुढे अर्ज करणे शक्य होणार आहे. अर्जदाराचे नाव, पत्ता, जन्म तारीख व मोबाईल क्रमांक याची खातरजमा झाल्यामुळे आता पुढील नमुद ६ अर्जाकरिता कार्यालयामध्ये येण्याची आवश्यकता नाही. तसेच नवीन अनुज्ञप्ती (लायसन्स) / नोंदणी प्रमाणपत्र अर्जदारास पोस्टाने पाठविण्यात येणार आहे. राज्यामध्ये दुय्यम नोंदणी प्रमाणपत्राकरिता वर्षभरात एक लाख अर्ज प्राप्त होतात. ना–हरकत प्रमाणपत्राकरिता वर्षभरात ३०,००० तर, नोंदणी प्रमाणपत्रावरील पत्ता बदलाकरिता २०,००० अर्ज, (लायसन्स)अनुज्ञप्तीचे दुय्यमीकरण प्रमाणपत्राकरिता दोन लाख अर्ज, अनुज्ञप्तीवरील (लायसन्स) पत्ता बदलकरिता दोन लाखाहून अधिक अर्ज प्राप्त होतात. अनुज्ञप्तीच्या नूतनीकरणाकरिता १४ लाख अर्ज प्राप्त होतात. आता ही सर्व प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने पूर्ण होणार आहे.

# वाढत्या उष्म्यात घ्या पशुपक्षांची काळजी : डॉ.प्रशांत कोकरे

**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

वाढत्या तापमानाचा फटका पशुपक्षांना बसत आहे. त्यामुळे पशुपालकांचे देखील नुकसान होत आहे. त्यामुळे उष्म्यापासून पशुपक्ष्यांची काळजी घेण्याचे आवाहन सुधागड तालुका पशुधन विकास अधिकारी डॉ. प्रशांत कोकरे यांनी केले आहे. या बरोबरच विविध उपाययोजना देखील सांगितल्या आहेत.

उन्हाळा ऋतूमध्ये जनावरे व कुक्कुट पक्षी यांची पशुपालकांनी योग्य काळजी न घेतल्यास अशी जनावरे व कुक्कुट पक्षी हे आजारी पडू शकतात किंबहुना अति उष्माघात झाल्यास मृत्युमुखी पडू शकतात.

पशुपालकांनी जनावरांना अति उष्माघात किंवा अति उन्हाचा त्रास होऊ नये यासाठी आपली जनावरे हे तीव्र उन्हाच्या वेळेत मुक्त सोडू नयेत. त्यांना आपल्या गोठ्यातच ठेवून योग्य संतुलित आहार व मुबलक स्वच्छ पाणी उपलब्ध करून द्यावे. पशुपालकांनी पशुसंवर्धन विभागामार्फत मिळणारे वैरण बियाणे योजना, वैरण विकास योजनेचा लाभ घ्यावा. त्याकरिता विहित नमुन्यात अर्ज सातबारा सहित तालुक्याचे पशुधन विकास अधिकारी किंवा आपल्या नजीकच्या पशुवैद्यकीय दवाखान्यात सादर करता येतो. असे डॉ. कोकरे यांनी सांगितले.

पक्षी गृह, गोठ्याच्या छतावर तसेच बाजूच्या भिंतीवर चुन्याचा लेप लावावा जेणेकरून कुक्कुट पक्षी दुधाळ जनावरांना उन्हाचा त्रास कमी होईल. पक्षी गृह व गोठ्याच्या छतावर नारळाच्या झावळ्या किंवा गवत साकारून किंवा पसरवून ठेवावे जेणेकरून उन्हाची तीव्रता कमी होऊन पक्षी गृह व गोठ्यात गारवा निर्माण होईल. उन्हाची तीव्रता कमी होण्यासाठी दुपारच्यावेळी पक्षी गृह व गोठ्याच्या छतावर पाण्याचे स्प्रिंकलरचा उपयोग करावा तसेच पक्षी गृह व गोठ्याच्या आतील तापमान कमी होण्यासाठी फॉगर्स बसवावेत, पक्षी गृह व गोठ्यात हवा खेळती राहण्यासाठी एक्झॉस्ट फॅन बसवावेत पक्षीगृहात व गोठ्याच्या बाहेरील बाजूने पोती लावून ठेवल्यास बाहेरील उष्ण हवेपासून पशूंचे संरक्षण



होईल. दिवसातून दोन ते तीन वेळा पोत्यांवर पाणी शिंपडून ती ओली करावी जेणेकरून कुक्कुट पक्षांना व जनावरांना थंडावा मिळेल. पक्षांना तसेच जनावरांना नेहमीपेक्षा लागणाऱ्या जागेपेक्षा जवळपास २० ते ३० टक्के जागा ही सद्यस्थितीमध्ये वाढवून द्यावी. कुकुट पक्षांमध्ये पाण्याची भांडीही नेहमीपेक्षा दुप्पट करावीत.

कुक्कुट पक्ष्यांना खाद्य देताना उजेड कमी करावा. म्हणजे कुक्कुट पक्ष्यांची हालचाल ही कमी होऊन कुक्कुट पक्ष्यांचे खाद्य खाणे वाढते. त्यामुळे अंडी उत्पादनात वाढ होते. उन्हाळ्यात कुकुट पक्ष्यांची अंडी उत्पादन कमी होऊ नये व उन्हाचा त्रास कमी करण्याकरिता खाद्यामध्ये फिड अंडी टीव्हीस वापरावेत. अशी उपाययोजना डॉ. कोकरे यांनी सांगितले. गाई–म्हशी, शेळ्या–मेंढ्या, कुक्कुट पक्षी व इतर जनावरांना आवश्यक लसीकरण करून घ्यावे. याकरिता नजीकच्या पशुवैद्यकीय दवाखान्यात संपर्क साधावा तसेच त्यांचे आवश्यक जंतनिर्मूलन, गोचीड व गोमाशा निर्मूलन हे पशुपालकांनी करून घ्यावे आणि त्या संबंधित रोगराई टाळावी.